सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार
क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :३७९/२०२४/नाशिक

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री. विठोबा लच्छिराम द्यानद्यान, रा. सर्वे नं.१९६, प्लॉट नं. १०५/५, जे. डी. स्टील, श्रमिक नगर, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२. | उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक), यांचे कार्यालय, नाशिक, जिल्हा परिषद, नाशिक ता. जि. नाशिक. |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**<u>सुनावणी दिनांक १४/०७/२०२५</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ०७/०७/२०२४ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १४/०७/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी तर्फे प्रतिनिधी उपस्थित होते. तर तक्रारदार व तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक ०७/०७/२०२४ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, "दि. ०३/११/२०२३ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. सबब, त्यांच्यावर कलम २०(१) नुसार प्रत्येक दिवसाला रुपये २५० प्रमाणे जी रक्कम २५,०००/- पेक्षा जास्त नको एवढी शास्ती लावण्यासह २०(२) नुसार शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात यावी. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८) ख नुसार मला झालेल्या शारीरिक, मानसिक त्रासापोटी रुपये ५०,००० (पन्नास हजार) नुकसान भरपाई मिळावी."

३) तक्रारदार यांनी दि. ०३/११/२०२३ रोजीच्या माहिती अर्जान्वये, दि. ०१/०१/२००६ पासून ते आजपर्यंत या कालावधीतील पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती. "टोकडे, ता. मालेगाव जि. नाशिक येथील विद्यासागर शिक्षण प्रसारक मंडळ टोकडे या संस्थेकडून सत्यवती कौर माध्यमिक विद्यालयात नोकर भरतीस मान्यता देण्याबाबत खालील मुद्दे निहाय माहिती मिळावी. (१) विद्यासागर शिक्षण प्रसारक मंडळ, टोकडे या संस्थेकडून मान्यता घेण्याकरिता आपल्या कार्यालयास प्राप्त एकूण प्रस्तावाची संख्या. (२) आपल्या कार्यालयाने मान्यता देण्यासाठी ज्या प्रस्तावाचा आधार घेतला त्या प्राप्त प्रस्तावाची संपूर्ण नस्ती मिळावी. (३) सदर प्रस्ताव ज्या दिवशी प्राप्त झाला त्याची आवक क्रमांकाची नोंद असलेल्या वहीच्या पानाची साक्षांकित प्रत मिळावी. (४) सदर प्रस्तावावर आपल्या कार्यालयाने दिलेली टिपणी व टिपणी वरील अभिप्राय माहिती मिळावी. (५) प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाने दिलेल्या मान्यता आदेशाच्या प्रती व मान्यता आदेशावर हस्ताक्षराखाली सक्षम अधिकाऱ्याने नाव टाकलेले नसल्यास मान्यता देणाऱ्या सक्षम अधिकारी यांचे नाव पदनाम तपशील मिळावा. उपरोक्त माहिती आरटीआय लोगोसह नंबरींगसह प्रमाणित करुन मिळावी."

४) सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे उपस्थित प्रतिनिधी यांनी प्रस्तुत प्रकरणी दि. ११/०७/२०२५ अन्वये अहवाल सादर केलेला आहे. मात्र, त्यात तक्रारदार यांच्या दि. ०३/११/२०२३ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही आहे याबाबतची कोणतीही वस्तुस्थिती नमूद करण्यात आलेली नाही. तसेच, तक्रारदार यांनी सुनावणीवेळी दि. १४/०७/२०२५ रोजी लेखी खुलासा सादर केला असून, त्यात संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०३/११/२०२३ च्या अर्जाच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

५) सुनावणीदरम्यान सादर केलेला युक्तिवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, तक्रारदार यांनी यांच्या दि. ०७/०७/२०२४ च्या तक्रार अर्जावर स्वाक्षरी केल्याचे दिसून येत नाही. तक्रारदार यांनी सदर प्रकरणी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येत नाही. तक्रारदार यांच्या दि. ०३/११/२०२३ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेत.

## आदेश

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक), यांचे कार्यालय, नाशिक, जिल्हा परिषद, नाशिक यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्तीनंतर १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(२) वरील निर्देशांसह प्रस्तूत तक्रार क्र. ३७९/२०२४/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

जावक क्र ९८२ 01 JAN 2026